सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय अनुदाने. संयुक्त प्रशिक्षण केंद्र, गारगोटी, जिल्हा कोल्हापूर या प्रशिक्षण संस्थेस अनुदान वितरीत करण्याबाबत.
मुख्य लेखाशिर्ष-२५१५ ००२६
(दुसरा हप्ता) ( माहे ऑगस्ट- डिसेंबर,२०१९)

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः अनुग्रा-२०१९/प्र.क्र. ६०/आस्था-१५
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१.
दिनांक : १९ ऑगस्ट, २०१९.

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक प्रशिक्षण-२०९३/प्र.क्र. ८४५/०९, दि.१७.०९.१९९३.
२) शासन परिपत्रक क्रमांक- ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक- प्रशिक्षण ११९९/प्र.क्र.५८१/६१, दिनांक २३.०९.१९९८.
३) शासन परिपत्रक क्रमांक-ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक- प्रशिक्षण-२०००/ प्र.क्र.८५९/४४, दि.१२.६.२००१.
४) शासन निर्णय क्रमांकः ग्राम विकास विभाग क्रमांक अनुग्रा-२०१९/प्र.क्र. ६०/आस्था-१५, दिनांक १३ मे, २०१९.

शासन निर्णय-

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता २५१५, इतर ग्रामीण विकास कार्यक्रम, ००३- प्रशिक्षण, ३१ सहाय्यक अनुदाने (०१) (०२) श्री मौनी विद्यापीठाच्या विद्यमाने गारगोटी येथे संयुक्त प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्याची योजना (सांकेतांक क्र.२५१५ ००२६), (योजनेत्तर)(दत्तमत)( मागणी क्र. एल -३) अंतर्गत संयुक्त प्रशिक्षण केंद्र, गारगोटी, जिल्हा कोल्हापूर यांना वेतनेतरसाठी रु. १०.०० लक्ष (रु.दहा लक्ष)व वेतनासाठी रु. ८१.६५ लक्ष (रु.एक्याऐंशी लक्ष, पासष्ट हजार ) असे एकूण रु. ९१.६५ लक्ष (एक्यान्नव लक्ष, पासष्ट हजार) इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.

२. सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या माहे एप्रिल ते जुलै ,२०१९ या कालावधीकरिता वेतनेतरसाठी रु. ३.५० लक्ष (रु. तीन लक्ष, पन्नास हजार) व वेतनासाठी संबंधितांनी मागणी केल्याप्रमाणे रु.२२.६६ लक्ष (रु.बावीस लक्ष, सहासष्ट हजार) असे एकूण रु. २६.१६ लक्ष (रु. सव्वीस लक्ष, सोळा हजार) इतके अनुदान दि.१३ मे,२०१९ च्या शासन निर्णयान्वये संयुक्त प्रशिक्षण केंद्र, गारगोटी, जिल्हा कोल्हापूर यांचेकरिता वितरित करण्यात आले आहे.

३. आता, माहे ऑगस्ट ते डिसेंबर, २०१९ या कालावधीकरिता वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८ जुलै, २०१९ अन्वये अर्थसंकल्पित निधीच्या एकूण वार्षिक तरतूदीच्या ६०% या मर्यादेनुसार संयुक्त प्रशिक्षण केंद्र, गारगोटी, जिल्हा कोल्हापूर यांच्या वेतनेतरकरिता रु. २.५० लक्ष ( रु. दोन लक्ष, पन्नास हजार) व वेतनासाठी रु.२६.३३ लक्ष (रु. सव्वीस लक्ष,तेहतीस हजार) असा एकूण रु. २८.८३ लक्ष (रु. अठ्ठावीस लक्ष, त्र्याऐंशी हजार) इतका निधी दुसरा हप्ता म्हणून वितरीत करण्यात येत आहे.

४ प्रशिक्षण केंद्राना अनुदान द्यावयाच्या कार्यपध्दतीबाबत शासन परिपत्रक क्रमांक प्रशिक्षण-११९८/प्र.क्र.५८१/६१ दि.२३ सप्टेंबर, १९९८ व शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक प्रशिक्षण २०००/प्र.क्र.८५९/४४, दि.१२ जून २००१ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांच्या अनुंषगाने उपायुक्त (आस्था), पुणे विभाग, पुणे यांनी सदर प्रशिक्षण केंद्रास दरमहा अनुदान अदा करण्याबाबत त्वरीत कार्यवाही करावी . तसेच संदर्भात दर्शविलेल्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक १२ मधील अटीनुसार केंद्रानी खर्च करावा.

५. सदर निधी वितरणाकरिता तसेच निधी ज्या बाबींकरीता मंजूर करण्यात आला आहे , त्याच बाबींवर खर्च करण्यात येईल याची काटेकोर अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित उपायुक्त (आस्था), विभागीय आयुक्त कार्यालय यांची असेल. तसेच सदर निधीचे उपयोगिता प्रमाणपत्रही तात्काळ सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

६. हा खर्च मागणी क्र.एल-३,"२५१५ इतर ग्रामविकास कार्यक्रम" ००३ प्रशिक्षण ०१(०२) श्री मौनी विद्यापीठाच्या विद्यमाने गारगोटी येथे संयुक्त प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्याची योजना (संकेतांक क्र.२५१५ ००२६) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) ३६, सहायक अनुदाने (वेतन) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो यावर्षी त्या लेखाशिर्षांतर्गत केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा. तसेच सदर खर्च त्याच संकेतांकाखाली खर्च पडतो आहे याबाबत ताळमेळ घालून खातरजमा करावी व त्याचा अहवाल विभागीय आयुक्तांनी दरमहा शासनास सदर करावा . सदर लेखाशिर्षाचे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त , पुणे यांच्या कार्यालयातील उपायुक्त (आस्थापना), हे काम पाहतील.

७. विभागीय आयुक्त कार्यालयाने प्रशिक्षण केंद्रास अनुदान वितरीत करताना वेतन व वेतनेतर बाबीवर प्रत्यक्ष किती अनुदानाची आवश्यकता आहे याची खातरजमा करुन त्यांना आवश्यक तेवढी रक्कम उपलब्ध करुन द्यावी. उपरोक्त नमूद केलेल्या अनुदानापेक्षा जास्त अनुदान वितरीत केले जाणार नाही याची दक्षता घ्यावी . तसेच प्रशिक्षण केंद्राने वेतनेतर व वेतनाकरिता दरमहा किती अनुदान आवश्यक आहे. याची पूर्वसूचना संबंधित आयुक्त कार्यालयास द्यावी. त्याप्रमाणे आयुक्त कार्यालयाने वेतनाकरिता अनुदान वितरीत करावे. आवश्यक असलेल्या अनुदानाबाबत पूर्वसूचना न दिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित केंद्राच्या प्राचार्यांची असेल.

८. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना प्रचलित निकष वित्तीय अधिकारांचे प्रत्यायोजन तसेच वित्त विभागाच्या दि.०८ जुलै, २०१९ च्या परिपत्रकातील अटी व शर्तीचे संबंधितांनी काटेकोरपणे पालन करावे.

९. या अनुदानातून संबंधित प्रशिक्षण केंद्राने केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे व पुस्तके तपासण्याचा अधिकार महालेखापाल, (लेखा) महाराष्ट्र-१ मुंबई आणि/किंवा महालेखापाल (लेखा) महाराष्ट्र-२ नागपूर यांना राहील व त्यांना त्यांचे हे काम योग्य तऱ्हेने पार पाडता यावे म्हणून संबंधित प्रशिक्षण केंद्र / संस्था, मदत / सुविधा पुरवतील.

१०. हा शासन निर्णय वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८ भाग १ ला, उपविभाग १ ते ५ मधील तरतूदीनुसार शासन निर्णय दिनांक १५/५/२००९ सोबतच्या उप विभाग - ३ मधील अ.क्र. १ परि. १६२, १६३, १६४ नुसार प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारांचा वापर करून व वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८ जुलै, २०१९ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८१९१०५३०२२२२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Digitally signed by Shashank Yashwant Barve
Date: 2019.08.19 13:06:12 +05'30'

( शशांक य. बर्वे )
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे (दोन प्रती)
२. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे (नोंदणीकृत डाकेने)
३. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई. (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
४. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर. (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
५. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, बाणेर रोड, पुणे
६. संचालक,राज्य ग्रामीण विकास संस्था, "यशदा", पुणे.
७. संचालक, श्री.मौनी विद्यापीठ गारगोटी, जि.कोल्हापूर
८. प्राचार्य, संयुक्त प्रशिक्षण केंद्र, गारगोटी, जि.कोल्हापूर (२ प्रतींसह)
९. वित्त विभाग (का.क्र.अर्थसंकल्प-१७/व्यय १५)
१०. कार्यासन.क्र. वित्त-१, वित्त-६, वित्त-७ ग्राम विकास विभाग
११. निवड नस्ती का.क्र. आस्था-१५